डीपोत

## जिल्हा निवडणूक अधिकारी ,यवतमाळ यांचे कार्यालय

---

क्रमांक /कली/सानि/कावी ५४ /२०१८
जिल्हा निवडणूक अधिकारी, यवतमाळ यांचे कार्यालय,
दिनांक १२/११/२०१८

दरपत्रक

विषय-लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०१९.
ईव्हीएम व व्हीव्हीपॅट जनजागृती मोहीम राबविण्याकरीता दर पत्रक मागविण्याबाबत .
संदर्भ – मा.मुख्यनिवडणूक अधिकारी महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्रमांक ईएलआर/२०१८/प्रक्र ६५६/१८३३
दिनांक ०१/११/२०१८

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०१९ करीता ईव्हीएम व व्हीव्हीपॅट ची जनजागृती करण्याकरीता यवतमाळ जिल्हयातील वणी ,केळापुर ,पुसद ,उमरखेड,आर्णी ,दिग्रस व यवतमाळ विधानसभा मतदार संघात प्रचार करण्याकरीता करीता टेम्पो चार चाकी (ACE) वाहन भाडयाने घ्यावयाचे आहे त्याकरीता दरपत्रक मागविण्यात येत आहे . दरपत्रकासोबत वाहनाचे कागदपत्रे लिफाफा क्रमांक १ मध्ये सादर करावेत व लिफाफा क्रमांक २ मध्ये दर सादर करावेत . सदर दरपत्रक दिनांक **१९ नोव्हेंबर ,२०१८ दुपारी ४.००** वाजे पर्यंत उपजिल्हा निवडणूक अधिकारी यांचे कार्यालयात सिलबंद पाकीटात सादर करावेत .दरपत्रक दिनांक २०/११/२०१८ रोजी दुपारी १२.०० वाजता उपजिल्हा निवडणूक अधिकारी यांचे कार्यालयात उघडण्यात येईल.

| अ क्र | विवरण | वाहनाचे नाव | दर प्रति दिवस (सर्व करासहीत ) |
|---|---|---|---|
| १ | चार चाकी वाहन | टेम्पो चार चाकी ACE | |

जिल्हा निवडणूक अधिकारी,यवतमाळ कार्यालयाकरीता खालील अटी व शर्तीवर आगामी लोकसभा सार्वत्रिकनिवडणूकी करीता वाहन भाडे तत्वावर घ्यावयाचे आहे .

१. वाहनाचे भाडे इंधन विरहीत वाहन चालकासहीत असावे (इंधन या कार्यालयाकडून पुरविण्यात येईल.)
२. वाहनाचा वेळोवेळी होणा-या दुरुस्तीचा खर्च वाहन धारकास करावा लागेल .
३. वाहन राज्य परीवहन विभागाकडून संपुर्ण करासहीत पास झालेले असावे .
४. वाहनाचा व्यावसायीक परवाना असणे आवश्यक आहे .
५. वाहन चालकाजवळ वाहनाचे लायसन्स असणे आवश्यक आहे .
६. वाहनासंबधीचे सर्व वैध कागदपत्रे उदा. वाहनाचे रजिस्ट्रेशन ,सर्वकष विमा,टॅक्स भरल्याची पावती , परीवहन विभागाचे आवश्यक कागदपत्रे दरपत्रक मंजुर झाल्यानंतर या कार्यालयास सादर करावे लागेल .
७. वाहनभाडयाने घेतल्यावर दौरा कालावधीत कोणतीही दुर्घटना झाल्यास व वाहन नादुरुस्त झाल्यास त्याबाबत या कार्यालयावर कुठलीही जबाबदारी राहणार नाही.
८. वाहनाचा वापर ग्रामीण भाग ,डोंगराळ अति दुर्गम भाग येथे केला जाईल.वाहन २४ तास उपलब्ध असावे वाहन सदैव सुव्यवस्थीत व स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी वाहन मालकाची राहील
९. वाहन भाडयाने घेतल्यापासून वाहनाची दुर्घटना पॉलीसी थर्ड पार्टी इंशुरन्स सह विमा पॉलीसी काढण्यात आली असावी .या विमा पॉलीसीमध्ये गाडी मध्ये बसलेला अधिकारी व कर्मचा-यांचा सर्वकष विमा असावा व याबाबतचे वैध कागदपत्रे अदयावत असावे .
१०. सदर भाडयाने घेतलेल्या वाहनाची आवश्यकता नसल्यास कोणत्याही वेळी पुर्व सुचना न देता करार रद्दकरून वाहन परत करण्यात येईल.
११. दिलेल्या दरामध्ये वाहन चालकाचे वेतन ,वाहनाचे दुरुस्ती व देखभालीवरील खर्चाचा समावेश राहील फक्त इंधन व वंगन या कार्यालयाकडून पुरविल्या जाईल.
१२. कार्यलयीन सुटीच्या दिवशी वाहन उपयोगात न आल्यास वाहनाचे त्या दिवसाचे भाडे वाहन मालकास देण्यात येणार नाही
१३. वाहनाचे निर्माण वर्ष १ जानेवारी ,२०१४ नंतरचे असावे व वाहनाची परीस्थीती पाहून नविन वाहन उपलब्ध झाल्यास सदर वाहन भाडे तत्वावर घेण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांना राहील.
१४. वाहन कीती कालावधी करीता भाडयाने घ्यावयाचे व कोणते कंपनीचे वाहन भाडयाने घ्यावयाचे याबाबतचे सर्वस्वी अधिकार जिल्हाधिकारी यवतमाळ यांचे राहील.
१५. वाहन भाडेतत्वावर घेण्यापुर्वी वाहन मालकास वरील अटी व शर्तीचा करारनामा १०० रुपयाचे स्टॅम्प पेपरवर करून दयावा लागेल .

**जिल्हाधिकारी तथा**
**जिल्हा निवडणूक अधिकारी ,यवतमाळ करीता**

प्रत- १. जिल्हा सुचना व विज्ञान अधिकारी ,जि.का.यवतमाळ माहीती व प्रसिध्दी करीता अग्रेषित.
२..जिल्हा नाझर ,जि. का. यवतमाळ माहीती प्रसिध्दी करीता अग्रेषित
/आपणास या व्दारे निर्देश देण्यात येते की, सदर दरपत्रकाची प्रत जिल्हाधिकारी कार्यालयाचे नोटीस बोर्डवर प्रसिध्द करून प्रसिध्दी अहवाल या कार्यालयास सादर करावा.
३. नायब नाझर ,त. का. यवतमाळ माहीती प्रसिध्दी करीता अग्रेषित
/आपणास या व्दारे निर्देश देण्यात येते की, सदर दरपत्रकाची प्रत जिल्हाधिकारी कार्यालयाचे नोटीस बोर्डवर प्रसिध्द करून प्रसिध्दी अहवाल या कार्यालयास सादर करावा.
४.---------------------------------------------------